श्री गजानन प्रसन्न, श्री लक्ष्मी नृसिंह प्रसन्न

दि .                    रोजी विवाहाच्या बैठकीमध्ये ठरवावयाच्या गोष्टी .

वराचे नाव – चि .
वधूचे नाव – चि .

१ . विवाह कोणत्या पद्धतीने करणे .

२ . विवाहाची तारीख, वार, तिथी, मुहुर्त .

३ . विवाहस्थळ -

४ . पुरोहितांची नावे -

५ . मुलाचे व मुलीचे देवक ठेवणारांची नावे -

६ . साखरपुडयाची तारीख, मुहूर्त -

७ . देणी – घेणी, मानपान यासंबंधी चर्चा -

॥ श्री ॥

साखरपुडा व विवाह यासाठी वरपक्षाकडून करण्यात येणा–या गोष्टी .

१ . साखरपुडयासाठी वधूला साडी, ब्लाऊज, परकर तसेच अंगठी घेतली जाईल . मुख्य ४ / ५ माणसांचे मान केले जातील . (अल्प )

२ . विवाहाचे वेळी वधूला मंगळसूत्र, नेकलेस, कानातले असे सुमारे            ग्रॅम सोन्याचे दागिने घालण्यात येतील . तसेच            जरीच्या साडया, शालू , ब्लाऊज, परकर ( शिलाईसह ) घालण्यात येईल .

३ . मुलाच्या बाजूने विवाहाच्या वेळी होणा–या धार्मिक विधींचा खर्च गुरूजींना विचारून सांगितल्यावर दिला जाईल .

४ . निमंत्रणपत्रिका तसेच येणे जाणे ( प्रवास ) याचा खर्च प्रत्येकाने स्वतंत्र करावा .

५ . मुलीकडील मुख्य माणसांचे मान त्यांच्या सांगण्याप्रमाणे ठरवून केले जातील . ( यथाशक्ती )

६ . व्याहीजेवण मुलाचे घरी ठरवून करण्यात येईल . त्यावेळी मुलीचे आई, वडील, भाऊ यांचा मान करण्यात येईल .

॥ श्री ॥

साखरपुडा व विवाह यांसाठी वधूपक्षाकडून अपेक्षित गोष्टी.

१. साखरपुडयासाठी हॉल, गुरूजी, अल्पोपहार सर्व व्यवस्था व त्यासाठी होणारा खर्च करावा, त्यादिवशी मुलाला अंगठी व शर्ट दयावा. तसेच मुलाकडील मुख्य ४ / ५ माणसांचे मान करावेत. ( माणसे येतील.)

२. विवाहासाठी मुलीला दागिने ( अंदाजे ग्रॅम सोन्याच्या ) करावे. तसेच मंगळसूत्रातील २ मणी व एकवारी याचा खर्च दयावा.

३. विवाहासाठी हॉल, केटरर्स, गुरूजी यांची संपूर्ण व्यवस्था व खर्च करावा. सकाळी मुलाकडून सुमारे माणसे येतील व स्वागतसमारंभासाठी सुमारे माणसे असतील. त्यांची सर्व व्यवस्था करावी. दोन्ही वेळचा मेनू एकमेकांच्या संगनमताने ठरवावा.

४. स्वागतसमारंभाच्या पोशाखासाठी मुलाला हजार रूपये व वरदक्षिणा म्हणून रू. दयावेत.

५. मुलाची आई, वडील, त्यांचे जावई व छोटी नात तसेच काका, काकू , मामा, मामी, करवल्या, मावश्या या सर्वांचे मान करावेत. ( यथाशक्ती )

६. वाजंत्री सनई, चौघडा तसेच फोटो, व्हिडिओशुटिंग यांची व्यवस्था करावी. ( हौशीप्रमाणे )

७. विवाहाच्या दिवशी रूखवत जमेल तसे मांडावे. त्यामध्ये काच सामान व स्टीलची भांडी अजिबात नको.

८. मुलीसाठी मुहुर्तमणी, जोडवी, विखल्या कराव्यात.

९. साखरपुडा व विवाह दोन्ही दिवशी लागणारे हार, पेढे, अक्षता हळदीकुंकू यांची व्यवस्था करावी.

१0. ग्रहमख व केळवण प्रत्येकाने स्वतंत्र करावे.

श्री ईश्वरकृपेने विवाहाचा ठरलेला हा शुभसमारंभ दोन्ही बाजूंनी एकमेकांच्या सहकार्याने आनंदात पार पाडावा. राग - रूसवे टाळावेत.

बैठक यशस्वी झाली.

बैठकीला हजर असणा-यांच्या सह्या. कळावे आ. स्नेहांकित